राज्याचे युवा धोरण -२०१२
राज्य व जिल्हास्तरावर युवा पुरस्कार देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः युकयो-२०१२/प्र.क्र.६५/क्रीयुसे-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १२ नोव्हेंबर, २०१३.

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-युकधो-२०११/प्र.क्र.४३/ क्रीयुसे-३, दिनांक १४ जून,२०१२.

प्रस्तावना -

आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर विविध विषयात युवांनी पार पाडलेल्या भूमिका, दिलेले योगदान यामुळे युवांची एक अद्वितीय समूह अशी ओळख समाजात झालेली आहे. युवांना मानव संसाधन विकासाचा मुख्य स्त्रोत म्हणून देखील मान्यता देण्यात आलेली आहे. युवा हा समाजाचा अविभाज्य घटक असून विकास प्रक्रीयेतील आवश्यक भाग आहे. समाजातील युवांची संख्या पाहता त्यांचेसाठी स्वतंत्र विचार करण्याची आवश्यकता आहे. वैश्विकरणाच्या युगात नवीन आव्हानांना तोंड देण्याकरीता युवांच्या सक्षमीकरणाची गरज आहे. त्या अनुषंगाने राज्याचे **युवा धोरण - २०१२** उपरोक्त शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने या धोरणातील शिफारशीच्या अनुषंगाने **राज्य व जिल्हा युवा पुरस्कार** देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

राज्यातील / जिल्ह्यातील युवांनी केलेले समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य व जिल्हास्तरावर युवा पुरस्कार प्रतिवर्षी देण्यास खाली नमूद विहीत केलेल्या तरतूदीनुसार शासन मान्यता देण्यात येत आहे.

**१) पुरस्काराचे स्वरुप -**

- जिल्हा युवा पुरस्कार जिल्हास्तरावर एक युवक, एक युवती तसेच एक नोंदणीकृत संस्था यांना देण्यात येईल. सदरचा पुरस्कार गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम - रु.१० हजार (प्रति युवक व युवतींसाठी ), प्रति संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम - रु ५० हजार. अशा स्वरुपाचाअसेल.
- राज्य स्तरावर युवा पुरस्कार क्रीडा विभागाचे क्षेत्रिय विभागानुसार प्रत्येक विभागातील एक युवक, एक युवतीस एक नोंदणीकृत संस्था यांना देण्यात येतील. सदरच्या पुरस्काराचे स्वरुप गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार व्यक्ती रु.५० हजार व संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार रु १.०० लक्ष असे असेल.

२) **पात्रतेचे निकष** -

२) अ) युवक व युवतींसाठी पात्रता निकष -

- अर्जदार युवक/युवतीचे वय पुरस्कार वर्षातील १ एप्रिल रोजी १३ वर्षे पूर्ण व ३१ मार्च रोजी ३५ वर्षे पर्यंत असावे.
- जिल्हा पुरस्कारासाठी अर्ज करणा-या अर्जदाराचे त्या जिल्हयात सलग ५ वर्ष वास्तव्य तर राज्यस्तर पुरस्कारासाठी राज्यात १० वर्षे वास्तव्य असणे आवश्यक आहे.
- पुरस्कार व्यक्ती अथवा संस्थेस विभागून दिला जाणार नाही.
- पुरस्कार मरणोत्तर जाहीर करण्यात येणार नाही.
- केलेल्या कार्याचे सबळ पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. (उदा. वृत्तपत्र कात्रणे, प्रशस्तीपत्रे, चित्रफिती व फोटो इ.)
- अर्जदार युवक व युवतीने पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्ष क्रियाशिल कार्यरत राहणार असल्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहील.
- अर्जदार व्यक्तीचे कार्य हे स्वयंस्फूर्तीने केलेले असावे.
- एका जिल्हयात पुरस्कार प्राप्त करणारी व्यक्ती राज्यातील अन्य जिल्हयात जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही.
- केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी तसेच विद्यापीठ अंतर्गत महाविदयालयातील प्राध्यापक/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत.

३) ब) संस्थांसाठी पात्रता निकष -

- पुरस्कार संस्थेस विभागून दिला जाणार नाही.
- संस्थानी केलेल्या कार्याचे सबळ पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. (उदा. वृत्तपत्र कात्रणे, प्रशस्तीपत्रे, चित्रफिती व फोटो इ.)
- अर्जदार संस्थेने पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्ष क्रियाशील कार्यरत राहणार असल्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहील.
- अर्जदार संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १८६० किंवा मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० नुसार पंजीबध्द असावी.
- अर्जदार संस्था नोंदणी झाल्यानंतर किमान पाच वर्षे कार्यरत असणे आवश्यक आहे.
- अर्जदार संस्थांचे कार्य हे स्वयंस्फुर्तीने केलेले असावे.
- एका जिल्हयात पुरस्कार प्राप्त करणारी संस्था राज्यातील अन्य जिल्हयात जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही.
- अर्जदार / संस्थेच्या सदस्यांचा पोलिस विभागाने प्रमाणित केलेला चारित्र्य दाखला (संबंधित परिक्षेत्रातील पोलिस स्टेशन) देणे आवश्यक राहील.

३) **पुरस्कारासाठी मुल्यांकन-**

- युवा व युवा विकासाचे कार्य करणा-या संस्थांनी केलेले कार्य दि.१ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीतील गत तीन वर्षाची केलेली कार्य कामगिरी विचारात घेण्यात येईल.
- युवा अथवा नोंदणीकृत संस्थांनी ग्रामीण व शहरी भागात केलेले सामाजिक कार्य.
- राज्याचे साधन संपत्ती जतन व संवर्धन तसेच राष्ट्र उभारणीच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरणारे कार्य.
- समाजातील दुर्बल घटक, अनुसुचीत जाती, जमाती व जनजाती आदिवासी भाग इ. बाबतचे कार्य.
- शिक्षण, प्रौढ शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण, सांस्कृतिक, कला, क्रीडा, मनोरंजन, विज्ञान तंत्रज्ञान, व्यवसाय, महिला सक्षमीकरण, स्त्रीभ्रुण, व्यसनमुक्ती तसेच युवांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य.
- राष्ट्रीय एकात्मतेस प्रोत्साहन देणारे कार्य.
- नागरी गलिच्छ वस्ती सुधारणा, झोपडपट्टी, आपत्ती व्यवस्थापन तसेच स्थानिक समस्या,महीला सक्षमीकरण इ.बाबत कार्य, साहस, इ. बाबतचे कार्य.

४) **पुरस्कार निवड समिती**

खाली गठीत केलेल्या समित्यांनी या शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या कार्यप्रणालीचा अवलंब करुन पुरस्कारार्थींची निवड करावयाची आहे.

अ) **जिल्हास्तर पुरस्कार निवड समिती -**

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संबंधित विभाग | सहअध्यक्ष |
| ३ | राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी/जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त व्यक्ती | दोन सदस्य |
| ४ | जिल्हा समन्वयक, नेहरु युवा केंद्र | सदस्य |
| ५ | जिल्हा क्रीडा अधिकारी | सदस्य सचिव |

**ब) राज्यस्तर पुरस्कार निवड समिती -**

| | | |
|---|---|---|
| १ | मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण | अध्यक्ष |
| २ | मा.राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण | उपाध्यक्ष |
| ३ | मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव | सदस्य |
| ४ | राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी/राज्य युवा पुरस्कार प्राप्त व्यक्ती | दोन सदस्य |
| ५ | ४) मा.राज्य समन्वयक, नेहरु युवा केंद्र संघटन, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ६ | मा.आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा | सदस्य सचिव |

५) जिल्हा/राज्यस्तर अशासकीय सदस्य नियुक्तीचा अधिकार संबंधित समिती अध्यक्षांना राहील अशा सदस्याचा कार्यकाल पुरस्कार वर्षापुरता मर्यादीत राहील.

- गठीत समितीने प्रतिवर्षी एक युवा व एक संस्था यांच्या नावाची शिफारस राज्य पुरस्कारासाठी करावी.

५ ) **<u>पुरस्काराचे वेळापत्रक</u>** -

अ) **<u>जिल्हास्तर पुरस्काराचे वेळापत्रक</u>**

- फेब्रुवारी महिन्यात अर्ज मागविण्यात यावेत व मार्च महिना अखेर त्याची छाननी करण्यात येऊन पुरस्कार निवड समितीची बैठक घेण्यात येऊन पुरस्काराबाबत जिल्हा युवा पुरस्कार निवड समितीकडे अर्ज सादर करण्यात यावेत.
- एप्रिल महिन्यात जिल्हा स्तरावर पुरस्कार जाहीर करण्यात यावे.
- १ मे या महाराष्ट्र दिनी जिल्हा पुरस्काराचे वितरण करण्यात यावे.

**ब) <u>राज्यस्तर पुरस्काराचे वेळापत्रक</u>** -

- पुरस्कारासाठी एप्रिल अखेर अर्ज मागवावेत.
- राज्यस्तर पुरस्काराची छाननी दिनांक १५ जून पर्यत करावी.
- शासनाची अंतिम मान्यता दिनांक १५ जुलै पर्यत व्हावी.
- पुरस्कार वितरण दिनांक २३ ऑगस्ट रोजी करण्यात यावे.
- वेळापत्रकामध्ये परिस्थितीनूरुप बदल करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.
- वृत्तपत्रात प्रसिध्दी विभागा मार्फत बातमी देवून प्रसिध्दी दयावी.

जिल्हा व राज्यस्तर पुरस्कारासाठी लाभार्थींनी करावयाचा नमुना अर्ज प्रपत्र अ व ब मध्ये विहित केला आहे. अर्जदारांनी तो क्रीडा व युवा संचालनालयाचे संकेतस्थळ www.sports.maharashtra.gov.in **वर ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.**

राज्यस्तर व जिल्हास्तर पुरस्कार अनुदान मंजुरीचे अधिकार आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा यांना राहतील.

जिल्हास्तर पुरस्कारासाठी आहरण व संवितरण अधिकारी- म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तर राज्यस्तर पुरस्कारासाठी आहरण व संवितरण अधिकारी- म्हणून आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रधिकृत करण्यात येत आहे.

सदर नियम शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अमंलात राहतील.

नियमात अंशत:/पुर्णत: बदल करण्याचे अथवा नियम शिथील करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास राहतील.

सदर योजनेवरील खर्च हा मागणी क्र. ई -३ -२२०४ क्रीडा व युवक सेवा १०३ विद्यार्थीत्तर युवक कल्याण कार्यक्रम, १०-युवक कल्याण- ग्रामीण भाग, १०-युवा धोरणांतर्गत योजना, युवा पुरस्कार (२२०४ -५५६४ ) ३१ सहाय्यक अनुदाने वेतनेत्तर या लेखाशीर्षांतर्गत त्या-त्या आर्थिक वर्षात उपलब्ध तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या व वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्र. अनोसं ३९/व्यय-५ दिनांक १७.०१.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१११२११२२०४३३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2013.11.12 11:24:41 +05'30'

**(रा.चं. पाटील)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व जिल्हाधिकारी
२. राज्य समन्वयक नेहरु युवा केंद्र

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : युकयो-२०१२/प्र.क्र.६५/क्रीयुसे-३ चे सहपत्र**

**प्रपत्र -अ॰**

जिल्हा व राज्य पुरस्कार व्यक्तींसाठी अर्जाचा नमुना

**युवा पुरस्कार**

पुरस्कार वर्ष

| बाब | माहीती | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| अर्जदाराचे संपूर्ण नाव | नाव ----------- वडिलांचे नाव------------आडनाव---------------- | |
| पुरुष / महिला | | |
| पत्ता व संपर्क क्रमांक (दूरध्वनी, भ्रमणध्वनी क्रमांक) | | |
| ई- मेल व फॅक्स क्रमांक | | |
| जन्म तारीख<br>(जन्म तारीख पुरावा जोडावा) | (अक्षरी ------------------------------------------------------) | |
| शैक्षणिक पात्रता | | |
| व्यवसाय | | |
| युवा विकासाचे कार्य केलेले क्षेत्र | | |
| तीन वर्षातील कार्याचा तपशिल<br>(५०० शब्दामध्ये उत्कृष्ट कार्याची माहीती दयावी.वृत्तपत्र कात्रणे,फोटो जोडावेत) | | |
| सामाजिक दायीत्वातून कार्य केलेले हमीपत्र | | |
| ग्रामीण,शहरी,अनुसुचीत जाती व जनजाती ,झोपडपट्टी-दुर्गम प्रदेशात कार्य केले असल्यास विशेष माहीती दयावी | | |
| कार्याचा गौरव यापूर्वी केंद्र किंवा शासनाच्या इतर विभाग कडून केला असल्यास त्याची माहीती दयावी. | | |
| केंद्र व राज्य शासन शासकीय व निमशासकीय कार्यालय, तसेच विद्यापीठ अंतर्गत महाविदयालयातील प्राध्यापक/कर्मचारी असल्यास माहीती दयावी. | | |
| अर्जदार/संस्येचे पदाधिका-यांना मा.न्यायालयाने दोषी ठरविले असल्यास किंवा न्यायालयात दावा विचाराधिन असल्यास त्याबाबत माहीती दयावी. | | |
| युवक कल्याण विषय आगामी काळात कार्य करण्याचे क्षेत्र व भावी योजना | | |

# हमीपत्र

मी ---------------------------------------------अशी हमी देतो/ देते की, मी श्री/श्रीमती ---------------------- असे प्रमाणित करतो/ करते की, अर्जामध्ये दिलेली माहिती व सोबत जोडलेली कागदपत्रे सत्य असून खोटी आढळून आल्यास कायदेशीर कारवाईस मी वैयक्तीक जबाबदार राहीन.

दिनांक - स्वाक्षरी -

स्थळ - अर्जदाराचे नाव

ooooo

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्रमांक : युकयो-२०१२/प्र.क्र.६५/क्रीयुसे-३ चे सहपत्र**

प्रपत्र -ब॰

जिल्हा व राज्य पुरस्कार संस्थासाठी अर्जाचा नमुना

**युवा पुरस्कार**

पुरस्कार वर्ष -

| बाब | माहीती | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| अर्जदाराचे संपूर्ण नाव | नाव --------- वडिलांचे नाव-------------- आडनाव--------- | |
| पत्ता व संपर्क क्रमांक (दूरध्वनी, भ्रमणध्वनी क्रमांक) | | |
| ई- मेल व फॅक्स क्रमांक, | | |
| सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १८६० किंवा मुबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० नोंदणी प्रमाणपत्र साक्षंकीत प्रत | | |
| संस्थेच्या घटनेची प्रत ध्येय, उद्दिष्टांसह जोडावी. | | |
| संस्थेच्या पदाधिकारी यादी जोडावी | | |
| युवा विकासाचे कार्य केलेले क्षेत्र | | |
| संस्थेने केलेल्या कार्याचा तपशिल (मागील तीन वर्षातील ठळक कार्य ५०० शब्दात नमुद करावे,वृत्तपत्र कात्रणे,फोटो जोडावेत.) | | |
| संस्थेने केलेले कार्य केंद्र व राज्य शासनाव्दारे वित्तीय सहाय्य किंवा अन्य स्त्रोत किंवा स्वेच्छिक केले असल्यास माहीती | | |
| ग्रामीण,शहरी,अनुसुचीत जाती व जनाजाती,झोपडपट्टी-दुर्गम प्रदेशात कार्य केले असल्यास विशेष माहीती द्यावी. | | |

| | | |
|---|---|---|
| कार्याचा गौरव यापूर्वी केंद्र किंवा शासनाच्या इतर विभाग कडून केला असल्यास त्याची माहीती दयावी. | | |
| संस्येचे पदाधिकारी मा.न्यायालयाने दोषी ठरविले असल्यास किंवा न्यायालयात दावा विचाराधिन असल्यास त्याबाबत माहीती दयावी. | | |
| युवक कल्याण विषयक आगामी काळात कार्य करण्याचे क्षेत्र व भावी योजना | | |

हमीपत्र

मी ----------------------------------------------अशी हमी देतो/ देते की, सादर केलेली सर्व कागदपत्रे ही खरी आहेत. सादर केलेली कागदपत्रे माहिती खोटी आढळल्यास होणा-या कारवाईस पात्र राहीन असे हमीपत्र देत आहे.

दिनांक - स्वाक्षरी -

स्थळ - अर्जदाराचे नाव

oooo

# जिल्हास्तर समिती शिफारस

---------------------------------------------- या संस्थेची शिफारस सन------- या वर्षाच्या पुरस्कारासाठी -------------- विभागातून करण्यात येत आहे.

दिनांक - स्वाक्षरी

स्थळ - ( अध्यक्ष,)

जिल्हा युवा पुरस्कार समिती.

जिल्हा ------------------